# Media Publications of Shankarlal Agrawal Science College, Salekasa

## 2008-13

देशोन्नती

गोंदिया, मंगळवार दि. २५ ऑक्टोबर २०११

### अग्रवाल महाविद्यालयात शैक्षणिक सहलीचे आयोजन

*तालुका प्रतिनिधी/ २४ ऑक्टोबर*

**सालेकसा :** येथील शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालयाची शैक्षणिक सहल बालाघाट जिल्ह्यातील गांगुलपारा या प्रेक्षणिय, रमनिक, निसर्गरम्य स्थळी नेण्यात आली.

सहलीचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य डॉ. खुदळे यांच्या मार्गदर्शनात वनस्पती शास्त्राचे प्रमुख प्रा. खोब्रागडे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. सहलीचे आयोजन ८ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते. त्यात विद्यार्थ्यांना विविध वनस्पतीविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सोबत विहंगम झऱ्याचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला. सहलीच्या प्रयोजनासाठी प्रा. कदम मॅडम, प्रा. विवेक बहेकार, सुरेश बिसेन, लांडगे, दीपक नांगवसी विद्यार्थीतर्फे राहुल, रितेश, अमित, शैलेश, कार्तिक, मनोज, कु. आंचल, अनिता, मारती, मीनाक्षी, पल्लवी, चित्ररेखा, स्वाती, स्नेहा आदिंनी परिश्रम घेतले.

देशोन्नती

मंगळवार, दि. २४ जानेवारी २०१२

### अग्रवाल विज्ञान महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन आजपासून

*तालुका प्रतिनिधी/२३ जानेवारी*

**सालेकसा :** स्थानिक शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन उद्या (ता.२४) पासून आयोजित करण्यात आले आहे.

तीन दिवसीय स्नेह संमेलनाचे उद्घाटन माजी मंत्री महादेवराव शिवणकर यांच्या हस्ते कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम कटरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार खरवडे, पो.नि. संजय साबळे, कैलाश अग्रवाल उपस्थित राहणार आहेत. या स्नेहसंमेलनात बौद्धिक, सांस्कृतिक व मैदानी स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

लोकमत समाचार

नागपुर, मंगलवार, 31 जनवरी 2012

### प्रताप मेमोरियल ट्रस्ट की भूमिका महत्वपूर्ण : शिवनकर



स्नेह सम्मेलन के उद्घाटन अवसर पर संबोधित करते पूर्व मंत्री महादेवराव शिवनकर साथ में पुरुषोत्तम कटरे, संजय साबले आदि

गोंदिया। 30 जनवरी (लोस)

सालेकसा जैसे आदिवासी नक्सलप्रभावित क्षेत्र में शिक्षा को बढ़ावा देने के लिए प्रताप मेमोरियल चेरिटेबल ट्रस्ट द्वारा किए जा रहे प्रयास सराहनीय हैं. ट्रस्ट द्वारा संचालित किए जा रहे विद्यालय, महाविद्यालयों में हजारों छात्र-छात्राएं शिक्षा ग्रहण कर रहे हैं. स्थानीय लोगों के बच्चों को मुलभूत शिक्षा का अवसर दिलाने के लिए संस्था अपने स्तर पर प्रयास कर रही है. विद्यार्थियों के सर्वांगीण विकास के लि ए किए जा रहे कार्यों में सभी को सहयोग करने की आवश्यकता है. उक्त आशय के उद्गार राज्य के पूर्व वित्त मंत्री महादेवराव शिवनकर ने प्रताप मेमोरियल चेरिटेबल ट्रस्ट गोंदिया द्वारा संचालित शंकरलाल अग्रवाल महाविद्यालय सालेकसा के वार्षिक क्रीड़ा स्पर्धा एवं स्नेह सम्मेलन का उद्घाटन करते हुए व्यक्त किए. कार्यक्रम की अध्यक्षता ज़िला कांग्रेस कमेटी के अध्यक्ष पुरुषोत्तम कटरे ने की. अतिथि के रूप में ट्रस्ट के अध्यक्ष विशाल अग्रवाल उपस्थित थे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, देवी सरस्वती एवं स्व. शंकरलाल अग्रवाल के तैलचित्रों का पूजन एवं माल्यार्पण कर कार्यक्रम प्रारंभ किया गया. अतिथियों का शाल, श्रीफल एवं स्मृति चिह्न प्रदान कर स्वागत किया गया. कार्यक्रम में सालेकसा के तहसीलदार खरवडे, पुलिस निरीक्षक संजय साबले, प्रताप मेमोरियल चेरिटेबल ट्रस्ट के सचिव प्रफुल्ल अग्रवाल, पं. स. सदस्य कैलाश अग्रवाल, एम. बी. पटेल कॉलेज के प्राचार्य डॉ. एच. बी. चौरसिया, सावलराम बहेकार, डॉ. शक्तिकुमार सोनी एवं प्राचार्य डॉ. एस. वी. खुदले उपस्थित थे. स्नेह सम्मेलन के दौरान विद्यार्थियों के लिए विभिन्न प्रकार की खेल एवं सांस्कृतिक स्पर्धाओं का आयोजन किया गया. अंतिम दिन स्पर्धा के विजेता छात्रों को पुरस्कार वितरण समारोह में उपस्थित अतिथियों के हाथों पुरस्कार दिया गया.

### सभापति का सत्कार

**गोंदिया–** पंचायत समिति की नवनिर्वाचित सभापति लक्ष्मी रहांगडाले का महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिति की ओर से सत्कार किया गया. अध्यक्षता समिति के जिलाध्यक्ष मनोज दीक्षित ने की. इस अवसर पर महासचिव एल. यू. खोब्रागडे, दिनेश रहांगडाले, डी. एल. गुप्ता, सुभाष मेमन, वी. आर. दीप, सुनील बावनकर, जी. एन. बांते, पी. एम. पटले, आर.जी. मेश्राम, माधव टेंभरे, पी.बी. सयाम, यू.जी. हरिणखेडे उपस्थित थे.

लोकमत समाचार

नागपुर, मंगलवार, 6 मार्च 2012

न्यूज फोल्डर

### एड्स जनजागरण

**गोंदिया:** शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा में डॉ.एस.वी. खुदड़े के मार्गदर्शन में एड्स जनजागरण कार्यक्रम हुआ. प्रदीप ठाकुर, संतोष शिंदे, सुरेश वाघमारे, अर्जुन मांदाड़े, विलाश जोंधड़े, लीलाबाई पुसदकर की टीम ने एड्स के बारे में जनजागृति की.

लोकमत

सोमवार
दि. ३ सप्टेंबर २०१२

विज्ञान महाविद्यालयात

## क्रीडा दिन साजरा

सालेकसा | दि. २ (प्रतिनिधी)

**शंकरलाल** अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा स्मृती दिन क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.व्ही. खुदळे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून संचालक प्रफुल अग्रवाल, प्रा.मंगेश खोब्रागडे, प्रा. सुनील बिसेन, प्रा.वाय.टी. रहांगडाले, प्रा. मुकेश कटरे व इतर मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला दीप प्रज्वलन करून मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस.व्ही.खुदळे यांनी हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जीवन कार्यांची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला इतर प्राध्यापकांनी सुध्दा संबोधीत केले. कार्यक्रमाचे संचालन मुकेश कटरे तर आभार मंगेश खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सतीश अग्रवाल, पंकज आत्राम, मेश्राम, भौतमांगे, बावनकर, दीपक नागवंशी व महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

लोकमत

रविवार
दि. १६ सप्टेंबर २०१२

## शिक्षक दिन साजरा

गोंदिया | दि. १५ (तालुका प्रतिनिधी)



प्रताप मेमोरीयल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावीत शिक्षक दिवस साजरा केला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन याच्या जयंतीनिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.व्ही. खुदळे यांच्या मार्गदर्शनात साजरी करण्यात आली. डॉ. राधाकृष्णन यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंशासनाच्या माध्यमातून शिक्षकांचे कर्तव्य बजावले.

शिक्षक दिनाचे महत्व प्राचार्यांनी विषद केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

शिक्षकांची भूमिका उत्कृष्टपणे पार पाडणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून महाविद्यालयातर्फे त्यांना पुरस्कृत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी दिनेश उपाध्याय तर आभार प्रिती बोरकर यांनी मानले.

लोकमत

सोमवार, दि. ३ डिसेंबर २०१२

## विज्ञान महाविद्यालयात संविधान दिवस

सालेकसा | दि. २ (प्रतिनिधी)

प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टद्वारे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय, सालेकसा येथे संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय व्ही. खुदळे होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव प्रफुल अग्रवाल, सहसचिव माधव भिंगोले व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला भारतीय संधिवानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले व आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाला संबोधित करताना प्राचार्य डॉ. संजय खुदळे यांनी संविधान निर्मिती करताना डॉ. बाबासाहेबांनी केलेली मोलाची कामगिरी व यात येणाऱ्या अनेक अडचणींचा त्यांनी कसा सामना केला, याबद्दल मार्गदर्शन केले. प्रफुल अग्रवाल यांनी संविधानाचे महत्व पटवून दिले. सहसचिव माधव भिंगोले यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन मुकेश कटरे यांनी तर आभार मंगेश खोब्रागडे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी प्रा. बहेकार, सुनील बिसेन, आशिष पांडे, योगेश रहांगडाले, सतीश अग्रवाल, भास्कर लांडगे, सुमेध भौतमांगे, रेणू अग्रवाल, दीपक नागवंशी, मुकेश बावणकर, पंकज आत्राम, दीपक मेश्राम व विद्यार्थी प्रतिनिधींनी सहकार्य केले.